महाराष्ट्र शासन

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकातघर, दुसरा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई 400023.

परिपत्रक क्रमांक लेखा/११२०१५/एमआयएस/१३-अ दिनांक:- ७ सप्टेंबर-२०१५.

वाचा :- १) लेखा शाखा वैद्यकीय प्रतिपूर्ती/परीपत्रक/२०१४-१५, दिनांक १८/१२/२०१४.

२) लेखा घबांअ.११२०१५/कार्यसन-१३-मुंबई,दिनांक १८/०४/२०१५.

परीपत्रक :-

आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,महाराष्ट्र राज्य मुंबई या विभागाचा सर्व प्रकाराचा खर्च २०३९ राज्य उत्पादन शुल्क या लेखा शिर्षाखालील मंजूर अनुदानातून करण्यात येतो. विभागीय उपआयुक्त कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त अधिक्षक कार्यालयांकडून दरमहा झालेला खर्च प्राप्त करून त्यांच्या विभागाची दरमहा खर्चाची एकत्रित माहिती " **सर्वसा २९३-अ म** " या नमून्यात भरून आयुक्त कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. परंतू तसे न होता अधिक्षक कार्यालयांकडून दरमहा खर्चाची माहिती परस्पर आयुक्त कार्यालयाकडे सादर केली जाते. तरी, सदर परिपत्रकाद्वारे सर्व अधिक्षक कार्यालयांना सूचीत करण्यात येते की, या पुढे दरमहा खर्चाचे विवरण केवळ आपल्या विभागीय उप आयुक्त कार्यालयास पाठवावे, आयुक्त कार्यालयास पाठवूनये. विभागीय उप आयुक्त कार्यालयांनी दरमहा खर्चाची एकत्रित माहिती " **सर्वसा २९३-अ म** " या नमून्यात भरून आयुक्त कार्यालयास सादर करावी.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ च्या परिपत्रकाद्वारे सर्व विभागीय उप आयुक्त/अधिक्षक कार्यालयांना सूचीत करण्यात आले होते की, सर्व प्रकारच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे प्रस्ताव व सर्व प्रकारचे शासकीय अग्रीमाचे प्रस्ताव परस्पर आयुक्त कार्यालयास सादर न करता विभागीय उप आयुक्त कार्यालया मार्फत सादर करावे. परंतू असे निदर्शनास आले आहे की, काही अधिक्षक कार्यालय सदरचे प्रस्ताव परस्पर आयुक्त कार्यालयाकडे सादर करतात. यास्तव, सदर परिपत्रकाद्वारे सर्व अधिक्षक कार्यालयांना सूचीत करण्यात येते की, या पुढे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे/ सर्व प्रकारचे शासकीय अग्रीमाचे प्रस्ताव विभागीय उप आयुक्त कार्यालयास सादर करावे. आयुक्त कार्यालयास परस्पर सादर केलेले प्रस्ताव परत केले जातील व त्यामूळे प्रस्ताव मंजूर होण्यास विलंब झाल्यास त्याला सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, ... कार्यालय
आवक क्रमांक ....९२०० 
दिनांक ......८/१०/१५

नागरिक

सह संचालक(लेखा)
राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य

प्रत: १) सर्व विभागीय उप आयुक्त ,राज्य उत्पादन शुल्क कार्यालय यांनी उपरोक्त प्राप्त प्रस्तावांची छाननी करून आयुक्त कार्यालयास सादर करावी.

२)सर्व अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय.